दिवाणी दावा क्र. ६१५/२०२२
नियाजोद्दीन वि. हरन्याबाई व इतर
निशाणी क्र.१५ वर

//०८//

<u>सरतपास वादीतर्फे वकील श्रीमती.ए.बी. डक यांच्यामार्फत शपथेवर सुरु</u>:-

**०८.** माझ्या सरतपासातील मजकुर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. मला वादी क्र. २ ते ५ यांनी सदर दावा चालवण्याकामी अधिकार पत्र दिलेले आहे त्यावर सर्व वादींच्या सहया आहेत त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. अधिकार पत्राला याय **निशाणी १९** देण्यात येते. मी दावा मिळकत गट क्र. ७ चे ७/१२ ची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. ७/१२ च्या प्रतीला **निशाणी क्र. २०** देण्यात येते. मी दावा मिळकती संदर्भात झालेले दिनांक २९/०५/१९९१ च्या खरेदी खताची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यावर माझे वडीलांची लिहून देणार म्हणून सही असुन, लिहून घेणार म्हणून प्रतिवादी क्र. ०१ यांची सही आहे. खरेदी खताला **निशाणी क्र. २१** देण्यात येते. (प्रतिवादीचे वकीलांनी ७/१२ चे निशाणी २० व खरेदी खत निशाणी २१ ला निशाणी देण्यास हरकत नसल्याचे कळविले)

सरतपास पुर्ण.

<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री.एस.व्ही.देशमुख यांच्यामार्फत सुरु</u>:-

**०९.** मला चार भाऊ व चार बहिणी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत गट क्र. ७ मधील ५९ आर क्षेत्रात आम्ही वादी व आमच्या बहिणी मालक आहोत. हे म्हणणे खरे आहे की, या दाव्यात माझ्या बहिणी पक्षकार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, बहिणीनी दावा चालविण्याकामी अधिकारपत्र दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील हे दिनांक १०/०२/२००२ रोजी मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी हरन्याबाई हिचे माहेर कदमाचीवाडी ता. लोहा हे आहे. प्रतिवादी हरन्याबाई हिचे आईवडीलांना मुलगा नव्हता हे मला माहित नाही. प्रतिवादी क्र. ०१ चे हरन्याबाई हिचे वडील वारल्यानंतर तिचे नावावर वारसा हक्काने जमिनी आल्याचे मला माहिती नाही. प्रतिवादी क्र. ०१ ने तिचे माहेरची दगडसांगवी येथील जमिन बापुराव लक्ष्मण कदम यांना विक्री केली होती हे मला माहिती नाही. मला हे ही माहिती नाही की, दगडसांगवी येथील जमिन विक्रीतुन आलेल्या पैशातुन प्रतिवादी क्र. ०१ ने दावा मिळकत विकत घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, फेरफार क्र. १९३ अन्वये प्रतिवादी क्र. ०१ हरन्याबाई हिचे नावाची नोंद दावा मिळकतीचे ७/१२ ला झालेली होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी हरन्याबाई हिच्या नावाची खरेदी खत आजही कायम असुन कार्यान्वित आहे.

दिवाणी दावा क्र. ६१५/२०२२
नियाजोद्दीन वि. हरन्याबाई व इतर
निशाणी क्र.१५ वर

//०९//

१९. माझा जन्म १९७२ चा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी १८ वर्षाचा झाल्यानंतर हा दावा दाखल करेपावेतो प्रतिवादी क्र. १ विरुध्द खरेदी खताबाबत कोणतेही कार्यवाही केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सज्ञान झाल्यानंतर तीन वर्षात कोणतेही कार्यवाही केली नाही. साक्षीदार स्वत:होवून सांगतो की, खरेदी खत रदद् होवून मिळणेबाबत मी दावा दाखल केला नव्हता. मी तंटामुक्ती समितीकडे तक्रार केली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील सन २००२ साली मयत झाले त्यावेळी मालकी हक्कात माझे वडीलांचे नाव नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार क्र. १९३ चे नोंदीपासुन प्रतिवादी क्र. ०१ चे नाव ७/१२ ला मालक म्हणून नोंद झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार क्र. १९३ चे विरुध्द मी कोणत्याही सक्षम अधिका-याकडे अपील दाखल केले नव्हते.

**उलटतपास न्यायालयीन कामाकाजाची वेळ संपल्यामुळे तहकुब करण्यात आला.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-
**( आर.डी. वाबळे )**
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
अहमदपूर.

स्थळ - अहमदपूर.
दिनांक- २४/०९/२०२५